# २) जिल्हा आरोग्य अभियान (D.H.M.)

सर्वांना गुणवत्तापूर्वक आरोग्य सेवा पुरविणे, समाजातील गरीब, दुर्लक्षित भागावर लक्ष केंद्रित करण्याचे मुख्य उद्दिष्ट राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचे आहे. यात प्राथमिक आरोग्य सेवांमध्ये काही मुलभूत बदल करुन आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करण्याबरोबरच इतर आरोग्य कार्यक्रमांवरही लक्ष केंद्रीत केले आहे. की ज्याचा थेट समाजाच्या आरोग्याशी संबंध आहे. अशा सर्व बाबी लक्षात घेऊन या धोरणात सर्वत्र सुसुत्रता आणण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्य आरोग्य अभियानाची स्थापना केली असून राज्य आरोग्य संस्थेची केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार स्थापन केलेली आहे. आणि याच मार्गदर्शक सुचनानुसार प्रत्येक जिल्हा स्तरावर जिल्हा आरोग्य अभियानाची स्थापना करण्यात आलेली आहे.

**जिल्हा आरोग्य अभियान :-**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | :- | जिल्हा परिषदेचे अध्यक्ष |
| सहअध्यक्ष | :- | जिल्हाधिकारी |
| उपाध्यक्ष | :- | जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी |

यामध्ये त्या जिल्ह्यातील सर्व लोकसभा सदस्य, विधानसभा सदस्य, अध्यक्ष, स्थायी समिती, जिल्हा परिषद व कार्यक्रमाशी संबंधित असलेले इतर सर्व अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी - आयुष, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी इ. सदस्य असतात.

सदर समितीच्या वर्षातून किमान दोन बैठका व्हाव्यात.

**सभेचे नियमित विषय :-**

१) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या वार्षिक कृती योजनेस मान्यता देणे.

२) आरोग्य व कुटुंब कल्याण कार्यक्रमासंदर्भात आलेल्या प्रस्तावावर विचार विनिमय.

३) वार्षिक कृती योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा.

४) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत झालेल्या निर्णयावर कृती.

५) स्वयंसेवी संस्था / देणगीदार / इतर संस्था.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत प्रत्येक जिल्हा स्तरावर (जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी) जिल्हा आरोग्य समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

यामध्ये १) सुकाणु समिती, २) कार्यकारी समिती स्थापन केल्या आहेत.

## १) सुकाणु समिती

अध्यक्ष :- जिल्हाधिकारी

उपाध्यक्ष :- जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी

सदस्य सचिव :- जिल्हा आरोग्य अधिकारी

सदस्य :- इतर जिल्हास्तरीय सर्व विभागाचे अधिकारी व पदाधिकारी

वरील समितीची बैठक वर्षातून किमान ~~दोन~~ चार वेळा व्हावी.

## २) कार्यकारी समिती

अध्यक्ष :- मुख्य कार्यकारी अधिकारी

सदस्य सचिव :- जिल्हा आरोग्य अधिकारी

सदस्य :- इतर जिल्हास्तरीय सर्व विभागाचे अधिकारी व पदाधिकारी, स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी, चॅरिटेबल हॉस्पिटल्स इत्यादी सदस्य आहेत.

यांची बैठक दर ३ महिन्यातून एकदा व्हावी.